॥ आई मला पावसात जाऊ दे ॥

गायकः योगेश खडीकर
गीतः वंदना विटणकर
संगीतः मीना खडीकर

आई मला पावसात जाऊ दे
एकदाच ग भिजुनी मला चिंब चिंब होऊ दे ॥ धृ. ॥

मेघ कसे बघ गडगड करिती
विजा नभातुन मला खुणविती
त्यांच्यासंगे अंगणात मज खूप खूप नाचू दे ॥ १ ॥

खिडकीखाली तळे साचले
गुडघ्याइतके पाणी भरले
तऱ्हेतऱ्हेच्या होड्यांची मज शर्यत ग लावू दे ॥ २ ॥

बदकांचा बघ थवा नाचतो
बेडुकदादा हाक मारतो
पाण्यामधुनी त्यांचा मजला पाठलाग करू दे ॥ ३ ॥

धारेखाली उभा राहुनी
पायाने मी उडवीन पाणी
ताप खोकला शिंका सर्दी वाट्टेल ते होऊ दे ॥ ४ ॥